आयोजनाची जबाबदारी दिल्याबद्दल त्यांनी

# प्रिन्सिपल गुरुकुलमध्ये सायबर सिक्युरिटी कार्यशाळा संपन्न




लातूर : आपल्या देशात वाढते सायबर गुन्हे आटोक्यात आणण्यासाठी सायबर सिक्युरिटीचे ज्ञान प्रत्येकाला असणे आवश्यक झाले आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रिन्सिपल गुरुकुल विद्यालय, लातूर येथे सायबर सिक्युरिटी संदर्भात कार्यशाळा घेण्यात आली. यानिमित्ताने गायत्री आणि मुस्कान यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या प्रारंभिक उपस्थितांना सायबर सिक्युरिटीची शपथ देण्यात आली. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य सुरेशकुमार तायविडु आणि उपप्राचार्य पार्वती तायविडु अध्यापक भाग्यलक्ष्मी साबदे, करुणा टेंकाळे, सुजित पेंदलवाड, योगेश्वरी सगर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात विशेष करून राष्ट्रीय अपराध जांच ब्युरो, नवी दिल्ली. शाखा लातूरचे जिल्हा गुन्हे माहिती अधिकारी, ॲड. बसवेश्वर पसारे, प्रा. सुधीर चेरेकर, रुद्रा टाचले उपस्थित होते. माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मानवी जीवन सुलभ झाले असले तरीही, त्यामध्ये अडचणींची वाढ मोठ्या प्रमाणात झाली आहे. अशा घटना टाळण्यासाठी ही कार्यशाळा घेण्यात आली. असे गायत्री आणि मुस्कान यांनी व्यक्त केले.

# लातूर अँटीकरप्शन ब्युरोचा दणका : लाच घेताना अधिकारी जेरबंद!